रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

# सामाजिक संस्थांसाठी आवश्यक कायदे प्रशिक्षण शिबिर

## (सद्य:स्थितीत झालेल्या बदलांची माहिती)

## दि. १८-१९ नोव्हेंबर, २०१७

---

### कार्यक्रम अहवाल

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने दि. १८-१९ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत सामाजिक संस्थांसाठी आवश्यक कायदे आणि सद्य: स्थितीत झालेल्या बदलांची माहिती या विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर योजण्यात आले होते. सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या नोंदणीकृत संस्थांना लागू असणारे कायदे व मागील काही वर्षात त्यात झालेले बदल सामाजिक संस्थांच्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचावेत, त्याचे गांभिर्य त्यांच्या लक्षात यावे, ते प्रशिक्षित व्हावेत हा हेतू बाळगून म्हाळगी प्रबोधिनीने हे प्रशिक्षण शिबिर योजले होते.

यंदा या प्रशिक्षण शिबिरात महाराष्ट्र आणि तामिळनाडू (कन्याकुमारी) या दोन राज्यातील १३ जिल्यातून ३५ पुरुष आणि ६ महिला असे एकुण ४१ प्रतिनिधी सहभागी झाले होते.

या प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन सत्रात प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे यांनी प्रस्ताविक केले तर शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे धर्मादाय आयुक्त श्री शिवकुमार डिगे यांनी केले. डिगे यांचे स्वागत प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य अरविंद रेगे यांनी तुलसी रोप व पुस्तकभेट देऊन केले."सार्वजनिक धर्मादाय न्यास हा लोकांचा एक समुह आहे. विश्वस्त हा त्या न्यासाचा उपभोग शून्य स्वामी असतो. याचे भान संस्थाचालकांनी ठेवावे". असे प्रतिपादन शिवकुमार डिगे यांनी उद्घाटन सत्रात सहभागींना मार्गदर्शन करताना केले. संस्थासंचालनातील कायद्यात झालेल्या बदलांना सकारात्मकतेने सामोरे जाण्याचे आवाहन त्यांनी महाराष्ट्रातील सर्व सामाजिक संस्थांना केले.



**उद्घाटन सत्रात मार्गदर्शन करतांना श्री शिवकुमार डिगे**

संस्था नोंदणी कायद्यातील १८६० च्या नियमा नुसार **कायद्यातील तरतूदी व त्याची कार्यवाही** या विषयावर बोलताना विवेक अत्रे यांनी सदस्य, सभा कोरम, नियमावली, पदाधिकारी, दोन सभांमधील अंतर, किमान सभा, आर्थिक व्यवहारांची नियमावली, स्थावर जंगम मालमत्ता खरेदीची मार्गदर्शक तत्वे, कार्यक्रम समिती, आर्थिक समिती व्यवहार याच्या तरतूदी व कार्यवाही याचे सखोल विवेचन त्यांनी केले. तर **कायदे नियम यात झालेल्या बदलांची माहिती** त्यांनी सटीप दिली. "कायद्याचं अज्ञान असणं ही पळवाट असू शकत नाही. यासाठी सगळ्या संस्थांच्या सदस्यांनी संस्था संचालनाचे ज्ञान अवगत करुन घेणे अनिर्वाह्य आहे." असे अत्रे यांनी स्पष्टपणे मांडले.




**सहभागींना मार्गदर्शन करतांना श्री. विवेक अत्रे**

**लेखा विभाग परिक्षण, आवश्यक नोंदी व आर्थिक शिस्त** या विषयावरील सत्र आणि **आर्थिक कायद्यात झालेले बदल व त्याची पूर्तता व हिशेब ठेवण्याच्या पध्दतीत करावे लागणारे बदल** हे सत्र या दोन्ही सत्रांत श्रीराम पटवर्धन यांनी, भांडवली खर्च (Capital Expenditure) करताना उद्दीष्टांनुसार खर्चाची मार्गदर्शक प्रणाली, ठराव, तरतूदी, धनादेश, करारपत्र, बील, पावत्या बाळगणे, ३ कोटेशन, कायम मालमत्ता नोंदवही (Fixed Asset Register) या कामाची तपशीलात मांडणी केली तसेच वारंवार होणारे खर्च (Recurring Expenditure) याच्या अंतर्गत येणारे खर्च, वीज, साहित्य, पाणीपट्टी, टेलीफोन बील प्रवास खर्च, पणन यांचे सविस्तर नोंद हवी, याची उजळणी त्यांनी घेतली. आर्थिक जगतातल्या घडामोडी समजून घेण्यासाठी ईकॉनॉमिक टाईम्स सारखी वृत्तपत्र वाचनाची सवय हवी हे त्यांनी सहभागींना सांगितले.



**सहभागींना मार्गदर्शन करतांना श्री. श्रीराम पटवर्धन**



**प्रशिक्षण शिबिरात उपस्थित सहभागी**

**CSR आणि FCRA (परकीय देणगी कायदा) यातील बदल व त्याची पूर्तता आणि ठेवावी लागणारी रेकॉर्ड** या दोन विषयांची सत्रे श्रीराम पटवर्धनांनी एकत्रित घेतली. त्यात त्यांनी '12-A' नोंदणी किती गरजेची आहे. FCRA - 2010 चा कायदा याच्या पूर्ततेसाठी लागणाऱ्या कागदपत्रांचे संकलन कसे करावे याचे त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यासाठी आपली संस्था NGO DARPAN पोर्टलवर नोंद असणे का व कसे गरजेचे आहे हे त्यांनी सहभागींना पटवून दिले.

**कार्यालयीन व्यवस्थापन** हे सत्र शरदमणी मराठे यांनी साकारले. या सत्रात त्यांनी सामाजिक व धर्मादाय संस्थाच्या संचालनातील कार्यालयाचे महत्व अधोरेखित केले व फाईल, रजिस्टर, कागदपत्रांची वेळो-वेळी करावी लागणारी पूर्तता याचे प्रयोजन व कार्यवाही कशी करावी हे सविस्तर सांगितले.



**सहभागींना मार्गदर्शन करतांना श्री. शरदमणी मराठे**




**सहभागींना मार्गदर्शन करतांना श्री. चंद्रशेखर वझे**

प्रथितयश लेखापरिक्षक व जनकल्याण बँकेचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर वझे या प्रशिक्षण शिबिराच्या समारोप सत्राचे प्रमुख पाहुणे होते. "सामाजिक कार्य करताना चांगले काम का करायचं, तर पुन्हा चांगलं काम करण्याची संधी मिळेल म्हणून करायचं. सध्याचे कायद्यात झालेले बदल टिपूनघ्या आणि त्यावर कार्यवाही करताना प्रत्येक गोष्ट व्यावसायीक पध्दतीने करायला शिका". असे त्यांनी सहभागींना मार्गदर्शन करताना सांगितले. त्यांच्या हस्ते सहभागींना प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली. याप्रसंगी काही सहभागींनी आपले मनोगत व्यक्त केले. या विषयावरील प्रशिक्षण योजल्याबद्दल प्रबोधिनीचे त्यांनी आभार मानले. प्रबोधिनीचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी मिलिंद चाळके यांनी आभार प्रदर्शन केले. शेवटी वंदेमातरम् ने प्रशिक्षण शिबिराची सांगता झाली.





**सहभागींना प्रमाणपत्र देतांना श्री. चंद्रशेखर वझे**



**प्रशिक्षण शिबिरात उपस्थित सहभागी**